अधिकारी घडविणारी विश्वसनीय संस्था

# स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

UPSC /MPSC /BANKING / SSC

Director : Dr. Vilas S. Gajghate 9923262977

प्रश्नप्रत्रिका क्रमांक 202305
**BOOKLET NO.**

**2023**

Code : SP05

**संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब व गट क)**

सामान्य क्षमता चाचणी

वेळ : 1 (एक) तास

Paper No. 5

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा क्रमांक ह्या चौकोनात न विसरता बॉलपेनने लिहावा.

| परीक्षा - क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे ↑    ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नप्रत्रिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईनेचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(क) मराठी व इंग्रजी आकलनावरील प्रश्न अनुक्रमे फक्त मराठी व फक्त इंग्रजी भाषेत असतील.

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणारा नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे. पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नूमद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) (अ) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत".**

(ब) "Decision Making & Problem Solving" वरील प्रश्नांच्या चुकीच्या उत्तरांसाठी गुण वजा केले जाणार नाहीत. **प्रस्तुत प्रश्न वगळून प्रश्नपत्रिकेतील उर्वरित प्रश्नांकरिता उमेदवारांनी सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील.**

## ताकीद (नमूना)

ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणतयाही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिध्द करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम - ८२" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/ किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुध्दा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुध्द उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK.

# परीक्षार्थीचे स्व-आकलन

## ✦ संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब व गट क) ✦

| अ.क्र. | विषयाचे नाव | एकूण प्रश्न | मी सोडवलेले प्रश्न | बरोबर | चुक | कोणत्या घटकावर चुकले | चुकलेल्या घटकासाठी अभ्यासाचे केलेले नियोजन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | राज्यव्यवस्था | | | | | | |
| 2. | अर्थव्यवस्था | | | | | | |
| 3. | इतिहास | | | | | | |
| 4. | भुगोल | | | | | | |
| 5. | सा. विज्ञान | | | | | | |
| 6. | गणित व बुध्दीमत्ता | | | | | | |
| 7. | चालू घडामोडी | | | | | | |

🕮 ✍ मी अशी खात्री देतो की चुकलेल्या घटकावरती अभ्यास करुन भविष्यात त्या चुका टाळेल.

**कच्च्या कामासाठी जागा / Space For Rough Work.**

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

1 **भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (ICMR) बाबत योग्य विधाने ओळखा.**

(अ) भारतीय वैद्यकिय संशोधन परिषदेची स्थापना 1981साली झाली

(ब) स्थापनेच्या वेळी 'भारतीय संशोधन निधी असोसिएशन' नाव होते

(क) 1949 मध्ये या संस्थेचे नाव बदलून ICMR असे करण्यात आले

(ड) ही संस्था केंद्रिय शहर विकास मंत्रालय आधिनस्त म्हणून कार्य करते

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (ब) आणि (क) 2) फक्त (अ),(ब),(क) 3) फक्त (ड) 4) वरीलपैकी सर्व

2 **जेसींडा अर्डर्न हल्ली चर्चेत होत्या, त्यांची कोणत्या देशाचे पंतप्रधान म्हणून नियुक्ती करण्यात आली ?**

1) ऑस्ट्रेलिया 2) न्युझिलंड 3) फ्रान्स 4) जपान

3 **2020-21 मध्ये कोणत्या पंतप्रधानांचा जन्म शताब्दी महोत्सव साजरा केला आहे ?**

1) श्री.पी.व्ही. नरसिंहराव 2) श्री.व्ही.पी.सिंग 3) श्री. अटल बिहारी वाचपेयी 4) श्री.एच.डी.देवेगौडा

4 **अयोग्य विधान निवडा.**

(अ) काशी महाकाल एक्सप्रेस ही भारतातील दुसरी खाजगी रेल्वे आहे. (ब) या रेल्वेचा मार्ग दिल्ली ते लखनऊ आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (अ) 2) फक्त (ब) 3) अ आणि ब दोन्ही 4) यापैकी नाही

5 **शिवांगी सिंह : राफेल विमान चालवणारी पहिली महिला वैमानिक ठरली ती कोणत्या राज्याची रहिवाशी आहे?**

1) महाराष्ट्र 2) बिहार 3) उत्तरप्रदेश 4) मध्यप्रदेश

6 **TAMRA हे वेब पोर्टल कशासाठी सुरु करण्यात आले आहे?**

1) खाण कामासाठी पारदर्शक वैधानिक मंजूरी 2) पेन्शन धारकांना पासबुक पाहण्यासाठी

3) कोळश्याच्या दर्जाचे नियमन करण्यासाठी 4) बालकामगार मुक्त समाज निर्माण करण्यासाठी

7 **'पंडित नाथराव नेरळकर' यांना खालील कोणते पुरस्कार मिळाले आहेत ?**

(अ) कलादान पुरस्कार (ब) संगीत नाटक अकादमी फेलोशिप

(क) राज्य नाट्य महोत्सव श्रेष्ठ अभिनेता (ड) चतुरंग प्रतिष्ठान

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (अ),(ब),(क) 2) फक्त (ब) 3) फक्त (ब),(क),(ड) 4) वरीलपैकी सर्व

8 **सोली सोराबजी यांनी खालील कोणती पुस्तके लिहली आहेत ?**

(अ) द गव्हर्नर (ब) वर्ल्ड ऑफ ऑल ह्युमन राईट

(क) नाना पालखीवाल (ड) डाऊन मेमोरी लेन

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (क) 2) फक्त (अ),(ब),(क) 3) फक्त (अ),(ड) 4) वरील सर्व

9 **नॅशनल सिक्युरिटी गार्ड (NSG) बाबत अयोग्य विधान ओळखा**

1) NSG ची स्थापना 22 सप्टेंबर 1986 रोजी झाली आहे.

2) NSG चे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे.

3) हे भारताच्या समान्य प्रशासन अंतर्गत असणारे दहशतवादविरोधी युनिट आहे

4) 2021 मध्ये एम.ए. गणपती यांची NSG महासंचालक पदी नियुक्ती झाली.

10 **वज्र प्रहार 2021 हा युध्द सराव कोणत्या दोन देशा दरम्यान पार पडला?**

1) भारत-अमेरिका 2) भारत-जपान 3) भारत -बांग्लादेश 4) भारत - चीन

11 **'दादासाहेब फाळके आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव पुरस्कार 2021' बाबत अयोग्य जोडी ओळखा.**

1) सर्वोत्कृष्ट अभिनेत्री - दिपिका पदुकोण (छपाक)

2) सर्वोत्कृष्ट अभिनेता - अक्षय कुमार (स्पेशल 26)

3) सर्वोत्कृष्ट चित्रपट - तान्हाजी : द अनसंग वॉरियर

4) सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक - अनुराग बासू,लूडो

12 **'योन्साय लेडी' म्हणून खालीलपैकी कुणाला ओळखतात,**

1) पौर्णिमा राठी 2) प्राजक्ता काळे 3) शुभांगी जगताप 4) श्वेता चौधरी

13 **खालीलपैकी अयोग्य विधाने ओळखा**

(अ) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना ही 25 डिसेंबर 2000 रोजी सुरु करण्यात आली.

(ब) ग्रामीण भागातील जोडल्या न गेलेल्या पात्र लोकवस्त्यांना सर्व ऋतुमध्ये जोडणारे रस्ते पुरविणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) केवळ (अ) 2) केवळ (ब) 3) दोन्ही अयोग्य 4) यापैकी नाही

14 **इंद्रजाल हे काय आहे ?**

1) पहिला स्वदेशी ड्रोन डिफेन्स डोम 2) नासाची इन्फ्रारेड दुर्बिण

3) बहू रॉकेट्स प्रक्षेपित करणारी प्रणाली 4) चीनने बनविलेले स्पेस स्टेशन

15 **सस्टेनेबल डेव्हलपमेंट रिपोर्ट 2021 मध्ये कोणत्या देशाने प्रथम क्रमांक पटकावला?**

1) डेन्मार्क 2) स्वीडन 3) फीनलॅंड 4) जर्मनी

16 **होमरुल चळवळीदरम्यान टिळकांनी पुढीलपैकी कोणत्या धोरणांचा स्वीकार केला होता.**

(अ) देशी भाषांमधील शिक्षण (ब) अस्पृश्यता विरोध (क) भाषावार प्रांतरचना (ड) पुर्ण स्वराज्य

1) अ,क 2) अ,ब,क 3) फक्त ड 4) अ,ब,क,ड

17 **ब्रिटिश उद्योगांना दिलेले भारतीय अनुदान - असे रेल्वेचे वर्णन पुढीलपैकी कोणी केले?**

1) म.गो.रानडे 2) जि.व्ही. जोशी 3) दादाभाई नौरोजी 4) गोपाळ कृष्ण गोखले

18 **चार आण्याच्या गांधी टोपीसाठी जिवाची बाजी लावणारा तरुण देशभक्त तुळशीदास जाधव यांचा परिचय महाराष्ट्राला कोणत्या प्रसंगात झाला?**

1) छोडो भारत आंदोलनादरम्यान 2) सोलापूरवर लावलेल्या मार्शल लॉ दरम्यान

3) धारासना सत्याग्रहादरम्यान 4) सायमन कमिशन विरोधी आंदोलनात

19 **पुढे दिलेल्या विधानांपैकी असत्य विधाने ओळखा.**

(अ) 1829 साली केलेला सतीप्रथा बंदीचा कायदा सुरुवातीला केवळ बंगाल,बॉम्बे आणि मद्रास या तीनच प्रांतामध्ये लागू करण्यात आला

(ब) कॉर्नवॉलिस,लॉर्ड मिंटो आणि लॉर्ड हेस्टींग या गव्हर्नर जनरलांनी सती प्रथा नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न केले होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (अ) 2) फक्त (ब) 3) दोन्ही (अ) आणि (ब) 4) दोन्ही नाही

20 **विजोड व्यक्ती ओळखा. (नाव व आडनाव)**

1) गंगाधरराव देशपांडे 2) वासूकाका जोशी 3) दादासाहेब खापर्डे 4) दामुअण्णा भिडे

21 **भारताच्या जमाखर्चाची तपासणी करण्याठी इ.सन 1896 ला बेल्बी कमिशन नेमले गेले या कमिशनपुढे कोणी साक्ष नोंदवली होती ?**

(अ) सुरेंद्रनाथ बॅनर्जी (ब) गोपाळकृष्ण गोखले (क) दिनशा वाच्छा (ड) सी.सुब्रमण्यम अय्यर

**पर्याय उत्तरे :**

1) फक्त (ब) 2) फक्त (अ),(ब) 3) फक्त (ब), (ड) 4) (अ),(ब),(क),(ड)

22 **त्या भारताला वैद्यकिय सेवा देणाऱ्या पहिल्या स्त्री डॉक्टर होत्या. त्यांनी स्त्रियांसाठी आरोग्यविषयक व्याख्यानमाला चालवल्या,राजकोट येथे त्यांनी रेडक्रॉस सोसायटीची शाखा उघडली त्या कोण होत्या ?**

1) डॉ. आनंदीबाई जोशी 2) रखमाबाई जनार्दन सावे 3) पंडिता रमाबाई 4) रमाबाई रानडे

23 **पुढे दिलेल्या विधानांपैकी सत्य विधान निवडा.**

(अ) 1876 मध्ये ज्योतिराव फुले यांनी अहमदनगर आणि पुणे या भागात सावकारी विरोधात आंदोलन उभे केले या आंदोलनाला खतफोडीचे बंड म्हटले आहे.

(ब) महात्मा फुले हे महाराष्ट्राचे कार्ल-मार्क्स होते - असे वर्णन माधवराव बागल यांनी केले आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (अ) 2) फक्त (ब) 3) फक्त (अ), (ब) 4) यापैकी नाही

24 **नाशिकचा जिल्हा न्यायाधीश जॅक्शनच्या खूनामध्ये अनंत लक्ष्मण कान्हेरे यांच्याबरोबर अजून दोन विद्यार्थी होते,त्यात पुढीलपैकी कुणाचा समावेश होतो**

(अ) काशिनाथ अंकुशकर (ब) दत्तात्रय जोशी (क) मारुती गणेश भोसले

**पर्यायी उत्तरे :**

1) (अ),(क) 2) (अ),(ब) 3) (ब),(क) (4) यापैकी नाही

25 **चुकीची जोडी ओळखा.**

| **1857 च्या उठावाचे ठिकाण** | | **व्यक्ती** |
|---|---|---|
| 1) बरौत | - | शाहमल |
| 2) रामगड (मांडला) | - | अवंतीबाई लोधी |
| 2) सावंतवाडी | - | रंगो बापूजी गुप्ते |
| 3) म्हैसूर | - | डंका शाह |

26 **राजकीय भिक्षावृत्ती या शब्दात जहालांनी पुढीलपैकी कोणत्या गटाच्या/व्यक्तींच्या धोरणावर टिका केली होती ?**

1) सर सय्यद अहमदखान 2) मुस्लिग लिग 3) कॉग्रेस मधील मवाळ गट 4) आगाखान

27 **रघुपती राघव राजाराम, पतीतपावन सिताराम, हे गांधीचे आवडते भजन देशभर म्हणायला केव्हापासुन सुरुवात झाली**

1) चौरीचौरा दंगलीनंतर 2) अहमदाबाद दंगलीनंतर 3) मीठ सत्याग्रहानंतर 4) गोलमेज परिषदेहून परतल्यावर

28 **पुढीलपैकी कोणती व्यक्ती भारतीय राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाला उपस्थित नव्हती ?**

(अ) गोपाळ गणेश आगरकर (ब) डॉ. भंडारकर

(क) फिरोजशहा मेहता (ड) के.टी.तेलंग

(इ) दिनशा वाच्छा

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (अ) 2) फक्त (अ),(इ) 3) (अ),(ब),(क),(ड) 4) यापैकी नाही

29 **सन 1853 मध्ये मुंबईमध्ये पहिली कापड गिरणी सुरु करणारे उद्योजक कोण?**

1) कावसजी नानाभॉय 2) जगन्नाथ शंकरशेठ 3) जमशेदजी टाटा 4) लॉर्ड डलहौसी

30 **सन 1934 च्या सुमारास मुस्लीम लीगमध्ये पुर्णपणे सक्रीय झालेल्या बॅरिस्टर जीना यांना असे करण्याकरिता खालीलपैकी कोणत्या नेत्याने सुचवले?**

1) लियाकत अली खान 2) मौलाना शौकत अली 3) इकबाल 4) नवाब वकार उलमुल्क

31 **योग्य जोड्या लावा**

| **'अ' स्तंभ (तत्ववेत्ता)** | | **'ब' स्तंभ (सिद्धांत)** | |
|---|---|---|---|
| (अ) | ॲरिस्टॉटल | (i) | जिओग्राफिया ग्रंथमाला |
| (ब) | जॉर्ज मार्श | (ii) | मानव व निसर्ग सिध्दांत |
| (क) | टॉलेमी | (iii) | कृषि स्थान सिध्दांत |
| (ड) | वॉन थुनेन | (iv) | मोटिओरालॉजिआ |

**पर्याय उत्तरे** :

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | i | ii | iii | iv |
| 2) | ii | i | iv | iii |
| 3) | iii | iv | ii | i |
| 4) | iv | ii | i | iii |

32 **महाराष्ट्रातून वाहणाऱ्या प्रमुख नद्यांचा त्यांच्या महाराष्ट्रातील लांबीनुसार योग्य चढता क्रम लावा.**

1) नर्मदा - तापी - भीमा - गोदावरी - कृष्णा 2) नर्मदा - तापी - कृष्णा - भीमा - गोदावरी

3) तापी - नर्मदा - भीमा - कृष्णा - गोदावरी 4) तापी - भीमा - नर्मदा - कृष्णा - गोदावरी

33 **अक्षवृत्ते व रेखावृत्ताविषयी दिलेली माहिती अभ्यासून अयोग्य विधाने असलेला पर्याय निवडा**

(अ) विषवृत्ताकडुन ध्रुवाकडे जाताना अक्षवृत्तांचा आकार व मुल्य कमी होत जाते

(ब) सर्व रेखावृत्ते ही अर्धवर्तुळाकार व समान लांबीची आहेत

(क) पृथ्वीवरील प्रकाशवृत्ते, अक्षवृत्ते व रेखावृत्ते काल्पनिक आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) 2) (अ), (क) 3) केवळ (अ) 4) (अ),(ब),(क)

34 **योग्य पर्याय निवडा**

विधान (अ) : भारताच्या पुर्व किनापट्टीजवळ आढळणारी समुद्रजलाची क्षारता ही पश्चिम किनापट्टीपेक्षा जास्त आहे

कारण (ब) : भारताच्या दोन्ही किनारपट्टीजवळ क्षारतेच्या बदलामागे गोड्या पाण्याचा पुरवठा हे प्रमुख कारण आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) (अ) व (ब) दोन्ही बरोबर हे (अ) चे योग्य स्पष्टीकरण देते
2) (अ) व (ब) दोन्ही बरोबर परंतु (ब) हे (अ) चे योग्य स्पष्टीकरण नाही
3) विधान (अ) बरोबर तर कारण (ब) चूक
4) विधान (अ) चूक तर कारण (ब) बरोबर

35 **निलगिरी पर्वतरांगाविषयी विधाने अभ्यासा.**

(अ) या पर्वतरांगत उत्तर सह्याद्री दक्षिण सहयाद्री व पूर्वघाट एकत्र येतात.

(ब) दोडाबेट्टा (2637 मीटर) हे या पर्वत रांगेतील सर्वात उंचीचे शिखर होय.

**पर्यायी उत्तरे :**

1) (अ) बरोबर (ब) चुक 2) (अ) चुक (ब) बरोबर 3) (अ), (ब) बरोबर 4) दोन्ही चूक

36 **योग्य जोड्या जुळवा**

| **स्तंभ 'अ'** | **स्तंभ 'ब'** |
|---|---|
| (अ) देशातील पहिली कागद गिरणी | (i) कुल्टी |
| (ब) भारतातील पहिले आकाशवाणी केंद्र | (ii) सेरामपुर |
| (क) पहिला आधुनिक पोलाद कारखाना | (iii) दिल्ली |
| (ड) देशातील प्रथम दुरदर्शन सेवा | (iv) मुंबई |

**पर्याय उत्तरे** :

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | i | iii | iv | ii |
| 2) | ii | iv | i | iii |
| 3) | iv | iii | ii | i |
| 4) | ii | iii | i | iv |

37 **पुढील विधाने अभ्यासून त्यापैकी योग्य विधान निवडा**

(अ) पालघर जिल्ह्यातील 'तारापूर' हा देशातील पहिला अणूउर्जा प्रकल्प होय.

(ब) सायरस ही देशातील पहिली अणूभट्टी होय.

(क) क्राकपार हा अणूऊर्जा प्रकल्प उत्तर प्रदेश राज्यात आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) (अ) फक्त 2) (अ),(ब) 3) (ब), (क) 4) (अ),(ब),(क)

38 **खालीलपैकी कोणती विधाने बरोबर नाहीत.**

(अ) 15 ऑगस्ट 1999 रोजी परभणी जिल्ह्याचे विभाजन झाले

(ब) हिंगोली कयाधू नदीच्या किनाऱ्यावर वसले आहे.

(क) वसमत तालुका परभणी जिल्हयात आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (अ) 2) फक्त (अ),(ब) 3) फक्त (अ),(क) 4) (अ), (ब), (क)

39 **खालील विधाने पहा**

(अ) वरोरा तालुक्यातील पिंपळगाव टेकडी येथे लोहखनिज सापडते.

(ब) रेडी बंदरातून दगडी कोळसा निर्यात केला जातो.

(क) भारताच्या एकुण मॅगनीज साठयांपैकी 60% महाराष्ट्रात आहे.

**पर्याय उत्तरे** :

1) फक्त अ बरोबर 2) फक्त ब बरोबर 3) (अ), (ब) बरोबर 4) फक्त (ब), (क) बरोबर

40 **पुर्णा नदी प्रकल्पाअंतर्गत पुर्णा नदीवर बांधलेली दोन धरणे कोणती ?**

1) येलदरी व सिद्धेश्वर 2) कावेरी व उजणी 3) खडकवासला व उजनी 4) जायकवाडी व पानशेत

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

41 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान निवडा**

(अ) माळढोक अभयारण्य महाराष्ट्र राज्यात सर्वात मोठे अभयारण्य आहे.

(ब) इतक्यात या अभयारण्याचे क्षेत्र वाढवले गेले आहे माळढोक पक्ष्याच्या संख्येतील वाढीमुळे नाही तर सर्वव्यापी काळवीटामुळे

**पर्यायी उत्तरे :**

1) केवळ (अ) 2) केवळ (ब) 3) दोन्ही 4) एकही नाही

42 **खालील विधाने पहा**

(अ) औरंगाबाद शहर जालना शहराच्या पश्चिमेस आहे.

(ब) उस्मानाबाद जिल्हा जालना जिल्हयाच्या उत्तरेस आहे.

(क) महाराष्ट्रातील फक्त 6 जिल्ह्यांची सीमा कर्नाटक राज्याला लागून आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (अ) बरोबर 2) फक्त क चुक 3) (अ), (ब), (क) चुक 4) (ब),(क) बरोबर

43 **राज्यांची त्यांच्या 2011 मध्ये नोंदविण्यात आलेल्या दशवार्षीय लोकसंख्या वाढीच्या टक्केवारीच्या तुलनेत उतरत्या क्रमाने मांडणी करा.**

1) उत्तरप्रदेश, बिहार, झारखंड, जम्मू व कश्मिर 2) बिहार, उत्तरप्रदेश, मेघालय व जम्मू कश्मिर

3) मेघालय, अरुणाचल प्रदेश, बिहार, जम्म व कश्मिर 4) अरुणाचल प्रदेश, बिहार, मेघालय, जम्मू व कश्मिर

44 **'लू' हे उष्ण वारे व शुष्क वारे आहेत जे उन्हाळयात वाहतात. त्याबाबत काय खरे नाही.**

(अ) जमिनीच्या वरच्या पापुद्रयांची उष्णता अतिशय वाढून हवेच्या वर वाहण्याने लू वारे तयार होतात.

(ब) लू वारे मध्यान्ह पूर्व काळात सर्वाधिक असते.

**पर्याय उत्तरे :**

1) केवळ (अ) 2) केवळ (ब) 3) दोन्ही 4) एकही नाही

45 **पुढील दोन विधानांपैकी कोणते योग्य आहे?**

(अ) लॅटरीटिक मृदा मोसमी हवामानाच्या प्रदेशात आढळते.

(ब) लॅटरीटिक मृदा लोह,ॲल्युमिनियम,पोटॅश व चुनखडीयुक्त आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) केवळ (अ) 2) केवळ (ब) 3) दोन्ही 4) एकही नाही

46 **पुढे दिलेल्या विधानांपैकी योग्य विधान निवडा**

(अ) जीवनसत्व A, B, C हे पाण्यात विरघळणारे जीवनसत्व असल्याने त्यांचा कायम शरीरास पुरवठा होणे गरजेचे असते.

(ब) जीवनसत्व D, E, K हे पाण्यात विरघळत नाहीत तर मेदांमध्ये विरघळतात

(क) जीवनस्तव ड सोडून इतर सर्व जीवनस्त्वे आपल्या शरीरात तयार होतात

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (अ), (ब) 2) फक्त (ब), (क) 3) फक्त ब 4) (अ), (ब), (क)

47 **अयोग्य जोडी ओळखा**

| | **वनस्पती संप्रेरक** | | **परिणाम** |
|---|---|---|---|
| 1) | ऑकझीन्स | - | वनस्पतीची वाढ वरच्या दिशेने होते |
| 2) | जिब्रेलिन्स | - | यामध्ये खोडाची वाढ घडून येते |
| 3) | सायटोकायनिन | - | पेशी विभाजन |
| 4) | इथिलिन वायू | - | यामुळे नवीन पालवी फुटते |

48 **ध्वनीच्या वेगावर परिणाम करणारे घटक कोणते ते ओळखा.**

(अ) तापमान (ब) आर्द्रता (क) पारा (ड) पदार्थाची घनता

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (क), (ड) 2) फक्त (ब),(क), (ड) 3) (अ), (ब), (क), (ड) 4) फक्त (अ), (क), (ड)

49 **पुढे दिलेल्या यादीमधून वेगळा पर्याय निवडा**

1) वृध्दी संप्रेरक 2) प्रोलॅक्टीन 3) इस्ट्रोजेन 4) ऑकसीटोसीन

50 **अणूवस्तूमान संबंधी योग्य विधान निवडा**
(अ) अणूचे वस्तुमान त्यांच्या केंद्रकात एकवटलेले असते.
(ब) ते केंद्रातील प्रोटॉन व न्युट्रॉन यांच्या बेरजेइतके असते.
(क) ते मोजण्यासाठी ऑक्सिजन अणू संदर्भ अणू म्हणून गृहित धरला जातो
(ड) डाल्टन हे अणूवस्तूमानाचे एकक आहे व त्यासाठी $\mu$ ही संज्ञा वापरण्यात येते.
**पर्यायी उत्तरे :**
1) फक्त (अ) व (ब) 2) फक्त (अ), (ब), (क) 3) फक्त (अ), (ब) (ड) 4) फक्त (अ), (ब), (क), (ड)

51 **क्ष - किरणांचा वेग हा _______ असतो**
1) प्रकाशाच्या वेगापेक्षा कमी 2) प्रकाशाच्या वेगापेक्षा जास्त 3) प्रकाशाच्या वेगाइतकाच 4) हवेच्या वेगाइतकाच

52 **अणूभट्टीमध्ये कॅडमियम रॉडचा उपयोग कशाकरिता करतात?**
1) न्युट्रॉन शोषून घेण्यासाठी 2) न्युट्रॉन तयार करण्यासाठी
3) न्युटॉनचा वेग कमी करण्यासाठी 4) न्युटॉनचा वेग वाढवण्यासाठी

53 **खालील कोणत्या ग्रंथीस मास्टर ग्रंथी म्हणतात.**
1) हायपोथॅलॅमस 2) पियुषिका ग्रंथी 3) पिनियल ग्रंथी 4) स्वादुपिंड

54 **खालील विधानांचा विचार करा**
(अ) रक्ताभिसरण, श्वसन, शिंकणे इत्यादी शरीरातील प्रमुख अनैच्छिक क्रिया आहेत.
(ब) हायपोथॅलॅमस हा अग्रमस्तिष्कांचा भाग या क्रियांवर नियंत्रण ठेवतो.
**पर्यायी उत्तरे :**
1) (अ) चुक तर (ब) बरोबर 2) (ब) चुक तर (अ) बरोबर
3) (अ) बरोबर तर (ब) योग्य कारण आहे 4) (अ) आणि (ब) दोन्ही चुक

55 **Milky Urine या आजारात मुत्रामध्ये कोणत्या घटकाच प्रमाण वाढते?**
1) फॉस्फेट 2) कॅल्शिअम 3) अल्बुमिन 4) वरीलपैकी नाही

56 **खालील विधाने विचारात घ्या**
(अ) मत्सवर्गीय प्राण्याचे हृदय दोन कप्प्यांनी बनलेले असते व एकेरी रक्ताभिसरण असते.
(ब) उभयचर प्राण्याच्या हृदयाला तीन कप्पे असतात
**वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहे**
1) फक्त (अ) 2) फक्त (ब) 3) (अ), (ब) दोन्ही 4) यापैकी नाही.

57 **खालीलपैकी कोणते थॅलोफायटा वनस्पतीचे उदाहरण आहे?**
1) एडीॲटम 2) इक्विसेटस 3) रिकसीया 4) सरगॅसम

58 **डाऊन सिड्रोम हा अनुवंशिक रोग आहे खालीलपैकी कोणत्या कारणांमुळे होतो.**
1) गुणसुत्राच्या संख्येतील बदलामुळे 2) गुणसुत्रातील संरचना बदलामुळे
3) DNA संरचनेतील बदलामुळे 4) RNA संरचनेतील बदलामुळे

59 **हाफकीन इन्स्टिटयुट मुंबई खालीलपैकी कशाच्या उत्पादन कार्यासाठी प्रसिध्द आहे.**
1) प्लेग लस 2) लेप्रसी लस 3) टेटॅनस लस 4) पोलिओ लस

60 **50 ओहम रोध असलेल्या विद्युत परिपथातुन 1.5 ॲम्पियर विद्युतधारा व वाहण्यासाठी त्या परिपथातील वाहकाच्या दोन ______ टोकात विभवांतर असावे.**
1) 62.5 Volt 2) 33 Volt 3) 45 Volt 4) 75 Volt

61 **गणेशची 5 विषयातील गुणांची सरासरी 60.6 असून उरलेल्या दोन विषयात त्याला 173 गुण मिळाले तर त्याची 7 विषयातील गुणांची सरासरी किती?**
1) 68 2) 66 3) 65.5 4) 64.6

62 **एका परिक्षेत 60 टक्के विद्यार्थी गणितात पास झाले व 70 टक्के विद्यार्थी इंग्रजीत पास झाले आणि 45 टक्के विद्यार्थी दोन्ही विषयात नापास झाले. तर या परिक्षेत किती टक्के विद्यार्थी नापास झाले?**
1) 35% 2) 25% 3) 45% 4) 15%

63 **200 मीटर लांबीची रेल्वे 75 किमी / तास व 250 मीटर लांबीची रेल्वे 33 किमी / तास एकमेकींच्या विरुध्द दिशेने धावत असल्यास त्या एकमेकींना किती वेळात ओलांडतील?**

1) 20 सेकंद 2) 15 सेकंद 3) 25 सेकंद 4) 35 सेकंद

64 **एका किल्ल्यावर काही सैनिकांना 50 दिवस अन्न पुरते 10 दिवसानंतर 500 सैनिक जास्तीचे आलेत त्यामुळे उर्वरित अन्न 35 दिवस पुरेल तर सुरुवातीला किल्ल्यावर किती सैनिक होते?**

1) 5300 2) 3500 3) 5400 4) 3400

65 **समान व्यासाच्या 4 नळांनी एक पाण्याची टाकी 9 तासात पुर्ण भरते जर यापैकी फक्त 3 नळ सुरु केले तर टाकी किती वेळात भरेल.**

1) 10 तास 2) 12 तास 3) 14 तास 4) 8 तास

66 **जर $\frac{a}{2} = \frac{b}{3} = \frac{c}{5}$ तर $\frac{a+b+c}{2}$ = ?**

1) 2 2) 4 3) 6 4) 3

67 **एका वर्गातील 75 विद्यार्थ्यांचे सरासरी वय 7 वर्षे आहे जर त्यात शिक्षकाचे वय मिळवले तर त्यांचे सरासरी वय 570 वर्ष होते तर शिक्षकाचे वय किती ?**

1) 37 वर्ष 2) 42 वर्ष 3) 45 वर्ष 4) 48 वर्ष

68 **एक घोडा 10 मी लांबीच्या दोराने एका ठिकाणी बांधला आहे. तो ज्या भागामध्ये चरु शकेल त्या भागाचे क्षेत्रफळ किती ? ($\pi = 3.14$)**

1) 312 चौमी 2) 314 चौमी 3) 316 चौमी 4) 318 चौमी

69 **खालील उदाहरणांत विसंगत अक्षर गट ओळखा.**

1) MMKY 2) LLXJ 3) KKWI 4) JJUH

70 **एका विशिष्ट कामासाठी 5 प्राचार्य (A, B, C, D & E) 6 इंजिनिअर्स (P, Q, R, S, T & U) आणि 7 चार्टर्ड अकाऊंटंट (H, I, J, K, L, M & N) मधून टिम निवडायची आहेत. त्यातील C, D, E, R, S, T, J, K, L या महिला आहेत व बाकीचे पुरुष आहेत. टीम निवडण्याचे काही नियम खाली दिले आहेत.**


1) जर टीममध्ये महिला प्राचार्य असेल तर त्या टीममध्ये पुरुष इंजिनिअरला घेता येणार नाही.
2) जर टीममध्ये पुरुष चार्टर्ड अकाउंटंट असेल, तर टीममध्ये महिला प्राचार्य नसेल.
3) एकाचवेळी टीममध्ये दोन पेक्षा जास्त पुरुष इंजिनिअर नसतील

जर टीममध्ये दोन इंजिनिअर,दोन चार्टर्ड अकाऊंटंट आणि तीन तीन प्राचार्य (प्राचार्यामध्ये कमीत कमी 2 महिला) असतील,तर खालीलपैकी कोणती टीम शक्य नाही ?

**पर्यायी उत्तरे :**

1) C D E R T J K 2) C D A R S J K 3) C D B R U J L 4) D E B S T K L

71 **खालील आकृतीचे निरीक्षण करा व विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर निवडा.**




**एम.पी.एस.सी. बॅकींग व यु.पी.एस.सी तिन्ही परीक्षा देणारे किती विद्यार्थी आहेत?**

1) 10 2) 23 3) 11 4) 13

72 **: 2, 4, 3.5, 6.5, 5.0, 9.0, 6.5, 12.5, 8.0, 14, … … … यापैकी विसंगत पर्याय निवडा.**

1) 3.5 2) 4 3) 5.0 4) 12.5

73 **सहा घंटा सुरुवातीला एकत्र वाजतात आणि अनुक्रमे 2, 4, 6, 8, 10, आणि 12 सेकंदानी वाजतात 30 मिनिटांमध्ये त्या किती वेळा एकत्र वाजतील**

1) 4 2) 10 3) 15 4) 16

74 **पुढील माहिती आणि त्यावर आधारित कृतिक्रम दिले आहेत. उचित कृतिक्रम दर्शवणारे पर्याय निवडा.**

माहिती : कृतिहीनतेमुळे गुंतागुंतीच्या चयापचय बदलांचा ओघ निर्माण होतो. न वापरलेल्या स्नायूंचा अपक्षय होतो, ते सहनशील रहात नाहीत त्यांची चरबीचे ज्वलन घडण्याची क्षमता संपुन ते आखडायला लागतात आणि मोठयाप्रमाणात ग्लुकोजवर अवलंबून राहू लागतात. कृतिहीन स्नायूच्या पेशींतील मायटोकॉंड्रिया म्हणजे चरबीचे ज्वलन करणाऱ्या ऊर्जा थैल्या नाहीशा होऊ लागतात. हे स्नायू ते जे काही जरासे काम करतात त्यासाठी ते कार्बोहायड्रेटसवर अवलंबून राहू लागतात, परिणामी न जळलेले लिक्विड जमा होऊ लागतात व रक्त खुप चरबीयुक्त होते.

कृतिक्रम :

(अ) लोकांनी जास्त प्रमाणात कार्बोहायड्रेटस असणारे अन्न खाणे थांबवायला हवे.

(ब) लोकानी रक्तातील चरबीचा साठा कमी व्हावा,यासाठी चरबीयुक्त अन्नघटक खाणे टाळायला हवे.

(क) लोकांनी सुदृढ रहाण्यासाठी शरीराच्या सर्व स्नायूंना समाविष्ट करणाऱ्या कृती केल्या पाहिजेत.

**पर्यायी उत्तरे :**

1) सर्व तीन कृतिक्रम योग्य आहेत
2) फक्त (अ) व (ब) हे कृतिक्रम योग्य आहेत
3) फक्त (अ) हा कृतिक्रम योग्य आहे
4) फक्त (क) हा कृतिक्रम योग्य आहे.

75 **एका कंपनीला कार्यालयातील लैंगिक भेदभाव समितीने गुन्हेगार म्हणून घोषित केले आहे. कंपनीच्या पंचवीस वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी फक्त दोन स्त्रिया आहेत. आणि अठ्ठावण्ण कनिष्ठ अधिकाऱ्यांपैकी फक्त दहा स्त्रिया आहेत. आरोपांच्या विरोधात स्वत:चा बचाव करण्यासाठी कंपनीने … … … … हे दाखवून देणे सर्वात उत्तम ठरेल.**

1) ते वरिष्ठ पुरुषांना व वरिष्ठ स्त्रियांना समान वेतन देतात
2) कंपनीत काम करण्यासाठी स्त्रियांच्या तुलनेत दहापट जास्त पुरुष अर्ज करतात.
3) कामाचा ताण आणि दिर्घ कार्यालयीन वेळा यांच्यामुळे विवाहित स्त्रियांना कंपनीत काम करण्याचे आकर्षण वाटत नाही
4) स्विकारलेल्या अर्जदारांच्या तुलनेत काम नाकारलेल्या सर्वांच्या पात्रता कमी होत्या.

76 **सुचक आर्थिक नियोजनाचे खालीलपैकी कोणते महत्वाचे वैशिष्ट्ये आहे ?**

1) खाजगी क्षेत्रासाठी सुद्धा लक्ष्य आखुन दिली जातात.
2) सर्व क्षेत्राच्या नियोजनात सक्तीचा घटक असतो.
3) फक्त सार्वजनिक क्षेत्रासाठी लक्ष्य आखून दिली जातात.
4) वरीलपैकी सर्व.

77 **दारिद्र्याची खालीलपैकी कोणती संज्ञा अशा परिस्थितीचे वर्णन करते ज्यामध्ये मुलभूत गरजा ही भागवल्या जात नाहीत?**

1) संपूर्ण दारिद्र्य 2) सापेक्ष दारिद्र्य 3) मोठया प्रमाणावरील दारिद्र्य 4) वरीलपैकी सर्व

78 **खालीलपैकी कोणती उपाययोजना 1991 च्या नविन औद्योगिक धोरणाचा भाग नाही?**

1) औद्योगिक परवाना पध्दतीची नष्ठता
2) सार्वजनिक क्षेत्राची भूमिका मवाळ केली गेली
3) संपत्तीची MRTP मर्यादा रद्द केली
4) आजारी कारखाने सरकारी अधिपत्याखाली आणले.

79 **नीती आयोगाचे विस्तारित रुप खालीलपैकी कोणते?**

1) नॅशनल इन्सीट्युट फॉर टेकनिकल इंडिया
2) नॅशनल इन्सीट्युट फॉर ट्रान्सफॉर्मिग इंडिया
3) नॅशनल इन्सीट्युट फॉर ट्रेडिशनल इंडिया
4) नॅशनल इंडस्ट्रियल इन्सफॉरमेशन इंस्टिट्यूट

80 **भारतात बचतीचा सर्वात महत्वाचा स्त्रोत खालीलपैकी कोणता?**

1) खाजगी कॉर्पोरेट बचत 2) सरकारी बचत 3) घरगुती बचत 4) परदेशी नागरिकांकडुन होणारी

81 **मनरेगा या रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे.**

1) या कार्यक्रमात स्त्रियांसाठी आरक्षण नाही.
2) या कार्यक्रमाअंतर्गत पुर्ण वर्षभर रोजगार पुरविण्याची बांधिलकी आहे.
3) मनरेगा ग्रामीण रोजगारीवर भर देते
4) मनरेगा ग्रामीण व शहरी या दोन्ही रोजगारीवर भर देते

82 **देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या खालील परिणामापैकी कोणत्या परिमाणात देशाच्या नागरिकांनी विदेशातून कमावलेली प्राप्ती समाविष्ट केली जाते ?**

1) एकुण देशातंर्गत उत्पादन
2) एकुण राष्ट्रीय उत्पादन
3) निव्वळ देशांतर्गत उत्पादन
4) स्थिर किंमतीत निव्वळ देशातंर्गत उत्पादन

83 **आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत खालीलपैकी कोणते साधन वित्तीय धोरणाचे साधन नाही?**

1) शासकिय खर्च 2) कर आकारणी 3) पतनियंत्रण धोरण 4) समतोल अंदाजपत्रक धोरण

84 **भारतातील विविध वर्षातील साक्षरता प्रमाण**

| | **वर्ष** | | **साक्षरता टक्केवारी** |
|---|---|---|---|
| (अ) | सन 1952 | (i) | 43.7% |
| (ब) | सन 1981 | (ii) | 52.2% |
| (क) | सन 1991 | (iii) | 74.04% |
| (ड) | सन 2011 | (iv) | 18.3% |

**योग्य क्रम लावा**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | iv | iii | ii | i |
| 2) | ii | iv | iii | i |
| 3) | iv | i | ii | iii |
| 4) | i | iv | iii | ii |

85 **लोकसंख्येच्या संक्रमणाच्या दुसऱ्या टप्प्याचे खालीलपैकी कोणते वैशिष्ट नाही?**

1) उच्च जन्मदर आणि उच्च मृत्युदर
2) वैद्यकिय सुविधांमध्ये सुधारणा
3) लोकसंख्येच्या बऱ्याच मोठया आकाराचा भाग दारिद्रय रेषेखाली असणे
4) शेतीक्षेत्रावर अधिक अवलंबित्व

86 **खालील विधाने विचारात घ्या.**

(अ) राष्ट्रीय कृषि विकास योजना सन 2007- 08 मध्ये सुरु करण्यात आली
(ब) किसान क्रेडिट कार्ड योजनेची अंमलबजावणी ऑगस्ट 1998 पासून करण्यात येत आहे.
(क) राष्ट्रीय कृषि विमा योजना भारतातील 16 राज्यात अंमलात आणली.

**वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहे**

1) फक्त (अ) 2) फक्त (क) 3) (अ) आणि (ब) 4) सर्व बरोबर

87 **कर महसूल स्थुल उत्पनाच्या वाढीशी लवचिक करण्याच्या दृष्टीने खालीलपैकी कोणता उपाय कर सुधारणा समितीने सुचविला होता?**

1) उच्च कर दर आणि संकुचित कर आधार
2) उच्च कर दर आणि प्रशस्त कर आधार
3) कमी कर दर आणि संकुचित कर आधार
4) कमी कर दर आणि प्रशस्त कर आधार

88 **पुढील विधानांचा विचार करा**

(अ) स्वातंत्र्यानंतर भारताचा पहिला अर्थसंकल्प 26 नोव्हेंबर 1947 ला आर. के. षण्मुख चेट्टी यांनी मांडला
(ब) भारतात सर्वात जास्त अर्थसंकल्प मांडण्याचा मान अर्थमंत्री मोरारजी देसाई यांनी मिळाला
(क) सन 2017 पासुन रेल्वे, LIC व सर्वसाधारण अर्थसंकल्प वेगवेगळे केले.

**पर्यायी उत्तरे :**

1) (अ) बरोबर, (ब) आणि (क) चुक 2) वरील सर्व बरोबर 3) (ब) आणि (क) बरोबर 4) (अ) आणि (ब) बरोबर

89 **भाववाढ नियंत्रण ________ मार्फत केले जाते**

(अ) रेपो (ब) उलट रेपो (क) रोख राखीव गुणोत्तर (ड) आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे कर्ज

**पर्याय उत्तरे** :

1) (अ) आणि (क) 2) (अ) आणि (ब) 3) (ब) फक्त 4) (अ), (ब) आणि (क)

90 **लिंगसापेक्ष विकास निर्देशांकात (GDI) कोणत्या पैलूचा विचार केला जातो?**

(अ) स्त्रियांचे अपेक्षित आयुर्मान
(ब) स्त्रियांमधील प्रौढ साक्षरता आणि शाळांमधील नावनोंदणी गुणोत्तर
(क) स्त्रियांचे दरडोई उत्पन्न
(ड) शेतात काम करणाऱ्या स्त्रियांची टक्केवारी

**पर्याय उत्तरे** :

1) (अ), (ब), (ड) 2) (अ), (ब), (क) 3) (ब), (क), (ड) 4) (अ),(ब),(क), (ड)

91 **भारताच्या राष्ट्रपतीच्या स्थानाबाबतची मते आणि त्यांची उगमस्थान यांची जुळणी करा?**

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | राज्याचा प्रमुख परंतू कार्यकारणीचा प्रमुख नाही | (i) | सर्वोच्च न्यायालय, राम जावया वि. पंजाब राज्य |
| (ब) | कार्यकारणीचा नामधारी आणि घटनात्मक प्रमुख | (ii) | के.एम.मुन्शी |
| (क) | नामधारी प्रमुख नाही | (iii) | एच.एन.पंडित |
| (ड) | भव्य शुन्याप्रमाणे आहे असे वाटत नाही | (iv) | डॉ.बी.आर.आंबेडकर |

**पर्याय उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | iv | i | ii | iii |
| 2) | i | ii | iii | iv |
| 3) | ii | iii | iv | i |
| 4) | iii | iv | I | ii |

92 **पुढील दोन विधानांपैकी कोणते योग्य आहे.**

(अ) 42 व्या घटनादुरुस्तीने संपत्तीचा अधिकार (मुलभूत हक्क) राहिलेला नाही.

(ब) संपत्तीचा अधिकार आता कायदेशीर हक्क झाला आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) केवळ (अ) 2) केवळ (ब) 3) दोन्ही 4) एकही नाही

93 **राज्यपालाबाबत 'सरकारीया आयोगाने' खालीलपैकी कोणत्या सुचनेची शिफारस केली नव्हती?**

1) राज्यपाल पद रद्द केले जाऊ नये

2) राज्यपालाची निवड घटकराज्यांनी दिलेल्या नामसुचीतून केली जाऊ नये.

3) कार्यरत राजकारणी राज्यपाल म्हणून नेमले जाऊ शकतील

4) केंद्रातील सत्ताधीश पक्षाचा असू नये

94 **भारतीय संघराज्याची वर्णने आणि वर्णनकर्ते विद्वान यांची जुळणी करा.**

| | गट (अ) | | गट (ब) |
|---|---|---|---|
| (अ) | सहकारी संघराज्य | (i) | सी.एच.अलेक्झंड्रोविच |
| (ब) | सौदेबाजीचे संघराज्य | (ii) | के.व्ही.राव |
| (क) | केंद्रीकरण झालेले संघराज्य | (iii) | डल्ब्धू.एच.मॉरिस जोन्स |
| (ड) | अर्ध संघराज्य | (iv) | ग्रॅनव्हिले ऑस्टिन |

**पर्याय उत्तरे** :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | iv | iii | ii | i |
| 2) | ii | i | iii | iv |
| 3) | iii | iv | i | ii |
| 4) | i | ii | iii | iv |

95 **पुढील दोन विधानांपैकी कोणते अयोग्य आहे ?**

(अ) स्मॉल कॉज कोर्टाचा निर्णय पुनर्निर्णयासाठी उच्च न्यायालयात नेल्या जाऊ शकत नाही

(ब) कनिष्ठ न्यायालयाने दिलेली मृत्युदंडाची शिक्षा पूनर्निर्णासाठी उच्च न्यायालयात पाठवावीच लागते त्याशिवाय अशी शिक्षा दिली जाऊ शकत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

1) केवळ (अ) 2) केवळ (ब) 3) दोन्ही 4) एकही नाही

96 **उत्तर पुर्व विभागीय परिषदेबाबत खालीलपैकी कोणते विधाने बरोबर नाही**

1) 1971 मधील भारताच्या उत्तर पुर्व विभागाच्या पुनर्रचनेच्या अनुरोधाने तिची निर्मिती करण्यात आली

2) 8 ऑगस्ट 1972 रोजी त्याची निर्मिती करण्यात आली

3) 2002 मध्ये परिषदेत सिक्कीमचा समावेश करण्यातआला

4) सद्या काळात परिषदेत सात सभासद घटकराज्य आहेत

97 **लोकसभेच्या विसर्जनाचे परिणाम.**

(अ) लोकसभेमध्ये प्रलंबित असलेली सर्व विधयके रद्द होतात.

(ब) लोकसभेने मंजूर केलेले परंतु राज्यसभेत अनिर्णित अवस्थेत प्रलंबित असलेली विधयके रद्द होतात

(क) राष्ट्रपतीचे पुनर्विचारासाठी परत पाठवलेली विधेयके रद्द होतात

(ड) प्रलंबित आश्वासने रद्द होत नाहीत आणि ते नवीन लोकसभेच्या शासकीय आश्वासन समितीद्वारे विचाराधीन राहतात.



स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

**पुढीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?**

1) (अ) आणि (ब) 2) (अ), (ब), आणि (क) 3) (ब), (क) आणि (ड) 4) (अ), (ब) आणि (ड)

98 **महाराष्ट्र राज्यात नगर पंचायती ची स्थापना करण्याबाबत अटींचा विचार करा.**

(अ) संबंधित क्षेत्राची लोकसंख्या 10000 ते 25000 दरम्यान असणे

(ब) बिगर कृषी व्यावसायिकांची संख्या 75% पेक्षा कमी नसणे

(क) जवळच्या महापालिकेपासून किंवा 'अ' वर्ग नगर परिषदेपासून ते क्षेत्र कमीत कमी 50 किमी अंतरापुढे असणे

(ड) राज्यपालाकडुन तशी धारणा होणे अत्यावश्यक

**पर्याय उत्तरे :**

1) केवळ (अ) आणि (ड) 2) केवळ (ब) आणि (क) 3) केवळ (क) आणि (ड) 4) सर्व

99 **खालीलपैकी कोण राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचा अध्यक्ष होऊ शकतो ?**

1) सर्वोच्च न्यायालयाचा कोणताही वर्तमान न्यायाधीश 2) फक्त सर्वोच्च न्यायालयाचा माजी न्यायाधीश

3) राष्ट्रपतीच्या मते विख्यात विधीज्ञ तज्ञ 4) फक्त सर्वोच्च न्यायालयाचा माजी मुख्य न्यायाधीश

100 **भारतीय राज्यघटनेत खालीलपैकी कोणत्या तरतुदी संसदेच्या साध्या बहुमताने दुरुस्त करता येतात?**

1) मतदारसंघाची पुनर्रचना 2) नागरिकत्व प्राप्ती आणि समाप्ती 3) पाचवे परिशिष्ट 4) वरीलपैकी सर्व

# ALL THE BEST

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

## सूचना माहितीस्तव - (पृष्ठ 1 वरून पुढे ........)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यक्तिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे. असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम - 82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/ किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ सपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग - 1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

## नमुना प्रश्न (माहितीस्तव)

प्र. क्र. 101. **'गुलामगिरी' हे पुस्तक कोणी लिहले आहे ?**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर  2) गो.ग. आगरकर
3) महात्मा फुले  4) राजा राममोहन रॉय

ह्या प्रश्नाचे उत्तर "(3) महात्मा फुले " असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 101. ① ② ● ④

अशा पध्दतीने प्रस्तुत प्रश्नपुसस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर - क्रमांक तुम्हाला स्वतंत्र्यरीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्यात त्या प्रश्नपक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळया शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

## कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK.

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

अधिकारी घडविणारी विश्वसनीय संस्था

# स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

SPANDAN Career Institute
The way of Success
Since 2008

UPSC/MPSC/BANKING/SSC

Director : Dr. Vilas S. Gajghate 9923262977

2023

Code : SPO5

## संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब व गट क)

सामान्य क्षमता चाचणी

वेळ : 1 (एक) तास

Paper No. 05

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

### सराव पेपर क्र . 05

| Question No | Answer | Question No | Answer | Question No | Answer | Question No | Answer |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 26 | 3 | 51 | 3 | 76 | 1 |
| 2 | 2 | 27 | 3 | 52 | 1 | 77 | 1 |
| 3 | 1 | 28 | 4 | 53 | 2 | 78 | 4 |
| 4 | 3 | 29 | 1 | 54 | 2 | 79 | 2 |
| 5 | 3 | 30 | 1 | 55 | 1 | 80 | 3 |
| 6 | 1 | 31 | 4 | 56 | 3 | 81 | 3 |
| 7 | 4 | 32 | 2 | 57 | 4 | 82 | 2 |
| 8 | 4 | 33 | 2 | 58 | 1 | 83 | 3 |
| 9 | 3 | 34 | 4 | 59 | 3 | 84 | 3 |
| 10 | 1 | 35 | 3 | 60 | 4 | 85 | 1 |
| 11 | 2 | 36 | 2 | 61 | 1 | 86 | 4 |
| 12 | 2 | 37 | 1 | 62 | 2 | 87 | 4 |
| 13 | 4 | 38 | 3 | 63 | 2 | 88 | 4 |
| 14 | 1 | 39 | 1 | 64 | 2 | 89 | 4 |
| 15 | 3 | 40 | 1 | 65 | 2 | 90 | 2 |
| 16 | 2 | 41 | 1 | 66 | 1 | 91 | 1 |
| 17 | 2 | 42 | 1 | 67 | 3 | 92 | 2 |
| 18 | 2 | 43 | 3 | 68 | 2 | 93 | 3 |
| 19 | 1 | 44 | 2 | 69 | 1 | 94 | 1 |
| 20 | 4 | 45 | 1 | 70 | 3 | 95 | 4 |
| 21 | 4 | 46 | 3 | 71 | 3 | 96 | 4 |
| 22 | 2 | 47 | 4 | 72 | 4 | 97 | 4 |
| 23 | 3 | 48 | 3 | 73 | 4 | 98 | 1 |
| 24 | 2 | 49 | 3 | 74 | 4 | 99 | 4 |
| 25 | 4 | 50 | 3 | 75 | 4 | 100 | 4 |

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर